# सांगोला तालुक्याच्या कृषी विकासातील चांदणे कुटुंबाचे योगदान

**डॉ.महेश तानाजी घाडगे,** सांगोला महाविद्यालय,सांगोला. ghadage.mahesh97@gmail.com

---

**प्रस्तावना :**

सोलापूर जिल्हा हा अवर्षण प्रवण क्षेत्रातील असल्याने निसर्गतः पावसाचे प्रमाण अत्यल्प आहे.जो पाऊस पडतो त्याच्यातही बराच मोठा खंड असल्याने शेती उत्पादन भरवशाचे नव्हते.त्यामुळे सोलापूर जिल्हा हा परतीच्या मान्सूनवर आधारित रब्बी हंगामाचा जिल्हा म्हणून पूर्वपार ओळखला जात होता. खरीप हंगामात शेती उत्पादन अत्यल्प होत असे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शेती उत्पादन वाढीसाठी शेती, जलसिंचन, पतपुरवठा, सहकार, शेती संशोधन इ. नवनवीन योजनांच्या माध्यमातून प्रयत्न झाले. यातून नवनवीन शेतीच्या पद्धती,नवीन पिके,आधुनिक शेती अवजारे,तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती विकास झाला. शेती उत्पादनात सोलापूर जिल्ह्याची जागतिक पातळीवर ओळख डाळिंब फळ पिकामुळे झाली.जागतिक पातळीवर सोलापूरच्या डाळिंबाची विशेष मागणी आहे.सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात सर्वाधिक डाळिंब उत्पादन घेतले जाते. या शेती बदलात प्रयोगशील शेतकऱ्याचे मोठे योगदान आहे.

**स्वातंत्र्य चळवळ आणि सदाशिव चांदणे :**

इ.स. 1927 साली महात्मा गांधीजींनी सोलापूर येथे भेट दिली. त्यावेळी त्यांच्या अहिंसा, सत्याग्रह, असहकार इ. विचारांचा सोलापूर जिल्ह्यातील तरुण कार्यकर्त्यावरती प्रभाव पडला. चंद्रशेखर झपके, संभाजीराव शेंडे, सदाशिव निवृत्ती चांदणे इत्यादी कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभाग घेतला आणि तुरुंगवास ही भोगला.[१] महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत माहितीनुसार सांगोला तालुक्यामध्ये 28 स्वातंत्र्य सैनिकानी स्वातंत्र्य चळवळीसाठी अमूल्य असे योगदान दिले. सदाशिव चांदणे यांनी महात्मा गांधीजींच्या आदेशानुसार खादी उद्योगाच्या प्रचार प्रसारासाठी व सर्वोदय उपक्रम राबविण्यासाठी एखतपूर येथे आश्रम स्थापन करून त्यामध्ये आपल्या कुटुंबासह वाहून घेतले. सदाशिव चांदणे यांच्या आचार विचारांचा प्रभाव प्रभाकर याच्यावरती झाला.

**प्रभाकर चांदणे आणि शेती :**

प्रभाकर सदाशिव चांदणे यांचा जन्म इ.स. 22 डिसेंबर 1946 साली एखतपूर ता. सांगोला येथे झाला. त्यांनी इ.स. 1968 साली इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचा डिप्लोमा केला.शिक्षण पूर्ण झाल्यावर प्रभाकर यांनी सिमेंट पाईपचा उद्योग सुरू केला.[२] सदाशिवरावांनी शेतीची वाटणी आपल्या मुलांमध्ये इ.स.1972 साली केल्यानंतर प्रभाकर यांना दहा एकर शेती वाटणीला आली. इ.स. 1972 च्या दुष्काळात पूर्वीची असणारी द्राक्ष बाग पाण्याअभावी जळून गेली. प्रभाकर यांनी इ.स.1973 साली द्राक्ष बाग नव्याने लावली. वारंवार पडणारा दुष्काळ,पाण्याची कमतरता यामुळे सांगोला परिसरातील शेतकरी कमी पाणी असणाऱ्या पिकांच्या शोधात होते. यावेळी प्रभाकर यांचा संपर्क तासगावचे वसंतराव आर्वे यांच्याशी झाला. वसंतराव आर्वे यांच्या सल्ल्यानुसार प्रभाकर यांनी इ.स.1974 साली प्रथम दोन एकर गणेश डाळिंबाची लागवड केली. डॉ. चिमा यांनी फळ संशोधन केंद्र, गणेशखिंड पुणे येथे विकसित केलेली 'गणेश' हा डाळिंबाचा वाण त्यावेळी बाल्यावस्थेत होता. प्रभाकर यांचे इ.स. 1974 ते 1977 सालापर्यंत विशेष लक्ष डाळिंब फळ पिकाऐवजी द्राक्ष या फळ पिकावरच होते.

**प्रभाकर चांदणे आणि डाळिंब:**

इ.स. 1977 साली प्रभाकर यांच्या डाळिंबास मुंबई मार्केटमध्ये पंधरा रुपये डझन इतका भाव मिळाला. यातून त्यांना वीस हजार रुपये उत्पन्न प्राप्त झाले.[३] तत्कालीन हा भाव अधिक असल्यामुळे प्रभाकर यांनी डाळिंबाकडे अधिक लक्ष देण्यास सुरुवात केली. याचवेळी सांगोला तालुक्यातील बाबुराव गायकवाड, चंद्रकांत कुमठेकर, सुरेश बेले, नानासाहेब भोसेकर, वसंतराव सावंत इत्यादी प्रगतशील शेतकऱ्यांनी डाळिंबाची लागवड केली होती.[४] यातून उत्पन्न मिळू लागल्याने तालुक्यामधील शेतकरी डाळिंबाची लागवड करू लागले. लागवडीखालील क्षेत्रामध्ये वाढत होत गेली. शेतकरी प्रभाकरांच्या शेतीस भेट देऊ लागली. त्यांच्याकडून

डाळिंबाची लागवड ते मार्केट पर्यंतचे मार्गदर्शन घेऊ लागले.शेतकऱ्याचा डाळिंबफळ पिकाकडील आकर्षण पाहता कृषी विभागामार्फत डाळिंब फळ पिकासंबंधी चर्चासत्रे आयोजित करण्यात येऊ लागली. स्टेट बँक ऑफ इंडिया ने शेतकऱ्यांना भांडवल उपलब्ध करून दिल्याने डाळिंबाखालील लागवडीत वाढ झाली.[५] सांगोला तालुक्यातील डाळिंब लागवडीचे यशस्वी प्रयोग पाहता सांगोला तालुक्याच्या आसपास असणारे मंगळवेढा, माळशिरस, पंढरपूर, मोहोळ या तालुक्यांमध्ये डाळिंबाचा प्रचार प्रसार होऊन डाळिंबाखालील लागवड सोलापूर जिल्ह्यात होऊ लागली.[६]

**सांगोला तालुक्यामध्ये डाळिंब लागवड जास्त होण्याची कारणे :**

डाळिंबास अतिशय पूरक असणारी जमीन सांगोला तालुक्यामध्ये मुबलक आहे. यामध्ये निकृष्ट दर्जाची हलकी जमीन, पाण्याचा निचरा पूर्णतः होणारी जमीन मुबलक आहे. सांगोला तालुका हा दुष्काळ प्रवण भागामध्ये असल्याने पावसाचे ही प्रमाण अत्यंत कमी आहे. डाळिंब हे अत्यंत काटक फळझाड असून तीन महिने पाणी कमी पडले तरीही झाड टिकून राहते. उष्णकटिबंधातील डाळिंबाचा बाजारातील मागणीनुसार वर्षातून कोणताही [मृग,हस्त,आंबे] बहार घेता येतो.[७] डाळिंब तोडल्यानंतर एक महिना खाण्यायोग्य ,विक्री योग्य राहते ,जर ते कोल्ड स्टोरेज मध्ये ठेवले असता तीन महिन्यापर्यंत ते खाण्यायोग्य राहते. केंद्र शासनाने काबुल ,अफगाणिस्तान येथून आयात होणाऱ्या डाळिंबापासून स्थानिक डाळिंब उत्पादकाला संरक्षण देण्याचे धोरण अंगीकारले. यामुळेही डाळिंबाला अंतर्गत बाजारपेठेमध्ये अधिक मूल्य प्राप्त झाले. रोजगार हमी योजनेसारख्या फळबाग लागवड योजना शासनाने हाती घेतल्याने डाळिंबाच्या लागवडीत वाढ झाली. पाण्याच्या कमतरतेवर उपाय म्हणून सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन पद्धतीचा अधिकाधिक वापर केला. सहकारी संस्थांच्या माध्यमातून तालुक्यामध्ये उत्पादन होणाऱ्या डाळिंबास विक्री व्यवस्था उभी केली. विविध बँकांकडून अर्थसहाय्य डाळिंब लागवडीसाठी पूरक ठरले. कृषी विद्यापीठातील तज्ञांचे मार्गदर्शन, चर्चासत्रे, मेळावे तसेच प्रयोगशील शेतकऱ्यांचे कष्ट यातून डाळिंब लागवडीत उत्तरोत्तर वाढ होत गेली.[८]

**कृषी विकास सहकारी संस्थेची स्थापना :**

प्रभाकर यांनी द्राक्ष पिकापासून आपले पूर्णतः लक्ष डाळिंबावर केंद्रित केले. इ.स. 1985 साली प्रभाकर यांनी पाण्याच्या कमतरतेमुळे सहा एकरावर ठिबक संच बसविला व विद्राव्य खताच्या वापरास सुरुवात केली. प्रभाकरांनी शेती दहा एकरावरून 70 एकरापर्यंत वाढवली. पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी दोन कोटी आणि पाच कोटी लिटर क्षमतेची दोन शेततळे खोदली. संपूर्ण शेती त्यामुळे डाळिंब बागायत करता आली. प्रभागरांनी शेतीतील डाळिंब मुंबईतील व्यापाऱ्यांच्या मदतीने निर्यात करण्यास सुरुवात केली. यामध्ये प्रभाकर यांना मार्केटमध्ये अनेक अडचणी आल्या, यातून मार्ग काढण्यासाठी त्यांनी सहकारी चळवळीचा आधार घेतला. इ.स. 1988 साली इतर डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांच्या सहकार्यातून 'कृषी विकास सहकारी संस्थेची' स्थापना केली.[९] संस्थेने डाळिंबाला राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चांगला दर मिळवून दिल्याने संस्थेच्या सभासदांची संख्या वाढत गेली. पहिल्या वर्षी दहा लाख असणारी संस्थेची उधाढाल पाच वर्षात नऊ कोटीवर पोहोचली. इ.स.1990 साली संस्थेतर्फे शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी सांगोला येथे 'कृषी सेवा केंद्र' स्थापन करण्यात आले. या कृषी सेवा केंद्र मार्फत सभासद शेतकऱ्यांना डाळिंबासाठी आवश्यक असणारी, योग्य दरात दर्जेदार औषधे, खते उपलब्ध करून देण्यात आली. सभासदांना डाळिंब बाजारपेठेत पाठविण्यासाठी ना नफा ना तोटा या तत्त्वावर पॅकिंग बॉक्स उपलब्ध करून देण्यात आले. राष्ट्रीय फलोत्पादन महामंडळाने कृषी विकास सहकारी संस्थेला इ.स. 1994 साठी फ्री कॉलिंग युनिट उभारणीसाठी सहा लाखाचे अनुदान आणि तीन लाखाची सवलत दिली. या माध्यमातून सांगोला येथे संस्थेचे प्री कुलिंग युनिट उभा करण्यात आले. याचवेळी दिल्ली येथील एनडीडीसी ने कोल्ड स्टोरेज आणि पॅकिंग हाऊस सुविधेसाठी 50 लाख अनुदान संस्थेसाठी मंजूर केले. यामुळे सांगोला, आटपाडी, जात, पंढरपूर, माळशिरस तालुक्यातील शेतकऱ्यांना बाजारपेठेतील भावांच्या चढउतारापासून संरक्षण मिळण्यासाठी या कोल्ड स्टोरेजचा उपयोग झाला. पडलेल्या भावास शेतमाल विकण्याऐवजी सभासद शेतकरी योग्य भाव मिळेपर्यंत वाट पाहू लागले. त्यामुळे त्यांच्या कष्टाला योग्य मोबदला प्राप्त होऊ लागला.

**अखिल महाराष्ट्र डाळिंब उत्पादक संशोधन संस्था:**

इ.स.1992 साली डाळिंब उत्पादक शेतकरी व प्रभाकर यांच्या पुढाकारातून अखिल महाराष्ट्र डाळिंब उत्पादक संशोधन संस्था स्थापन केले. या संस्थेच्या स्थापनेच्या निमित्ताने सांगोला येथे पंचवीस हजार डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांचा मेळावा घेण्यात आला.या मेळाव्यासाठी तत्कालीन केंद्रीय कृषिमंत्री बलराम जाखड उपस्थित राहिले. गुणवत्तापूर्ण डाळिंब उत्पादन व्हावे यासाठी किडीवरील संशोधन, गुणवत्ता नियंत्रण, डाळिंब उत्पादकांच्या समस्या, धोरण, निर्णय, शासनापर्यंत पोहोचविण्याचे कार्य या संस्थेमार्फत करण्यात आले. या संस्थेचे मुख्यालय इ.स.1993 साली पुणे येथे स्थलांतरित करण्यात आले. डाळिंबा बाबत नवनवीन माहिती, संशोधन, मार्केटिंग तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत पोचविण्यासाठी 'डाळिंब वृत्त' या नियतकालिकाची सुरुवात इ.स.1994 साली अखिल महाराष्ट्र डाळिंब उत्पादक संशोधन संस्थेमार्फत मार्फत करण्यात आली.[१०] डाळिंबाची लागवड महाराष्ट्र बाहेर मध्यप्रदेश, आंध्र प्रदेश, गुजरात, कर्नाटक राज्यात वाढत गेली. या राज्यातील डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना एकत्र आणण्यासाठी प्रभाकर यांच्या प्रयत्नातून इ.स. 2015 साली भारतीय डाळिंब उत्पादक संघटना स्थापन करण्यात आली. मात्र या संघटनेला फारसा प्रतिसाद मिळू शकला नाही. प्रभाकर यांना महाराष्ट्रातील प्रमुख सहा डाळींब उत्पादक संस्थांची मिळून 'महाअनार' ही सर्वोच्च संस्था इ.स. 2005 साली स्थापन करण्यात यश आले.[११] ही संस्था शेतकऱ्यांच्या डाळिंबांना परदेशी बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी प्रयत्न करते.

**प्रभाकर चांदणे आणि पुरस्कार:**

डाळिंब उत्पादक शेतकरी व प्रभाकर चांदणे यांच्या पुढाकारातून शरद पवार यांच्या सहकार्यातून सोलापूर येथे 'राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र' स्थापन करण्यात आले. कृषी व फलोत्पादन क्षेत्रात प्रभाकर यांनी केलेल्या कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाने इ.स.1994 साली 'कृषीभूषण पुरस्कार' देऊन त्यांचा गौरव केला.[१२] त्याचबरोबर त्यांना 'वसंतराव नाईक पुरस्कार' 'डाळिंब मित्र' असे विविध पुरस्कार त्यांच्या कार्याच्या गौरवाअर्थ प्राप्त झाले आहेत. प्रभाकर चांदणे यांच्या सारख्या प्रयोगशील शेतकर्यांनी नाविन्यपूर्ण प्रयोगातून एकूणच शेती व्यवसायाची प्रगती केली.यातून दुष्काळी जिल्ह्यातील शेतकर्यांना अर्थ प्राप्ती होऊन त्यांच्या जीवनमानात अधिक सुधारना झाली

**संदर्भ :**

१] Govt.of Maharashtra, Solapur District Gazetteer, Bombay, 1977, P. 277.

२] मुलाखत, चांदणे प्रभाकर, एखतपूर, 10 मे 2015.

३] पोलादी माणसं 285 292

४] बेले सुरेश, मान खोऱ्यातील पाणी नियोजन, 1998 ,पृष्ठ क्र.92 -96.

५] मुलाखत, भोसेकर नानासो ,सांगोला , दि. 15 जानेवारी 2012.

६] जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी कार्यालय, ऑफिस फाईल, सोलापूर.

७] नवलखा रवींद्र , डाळिंब वृत्त स्मरणिका, 2010.

८] फुले बी. आर., माण खोऱ्यातील पाणी नियोजन, 1998, पृष्ठ क्र. 10 – 20.

९] मुलाखत, चांदणे प्रभाकर सदाशिव ,एखतपूर, दिनांक 10 मे 2015.

१०] चांदणे प्रभाकर, माणखोऱ्यातील फळबागांचा विकास, भौगोलिक रचना व पृष्ठावरील साठवण माणखोऱ्यातील पाणी नियोजन, 1998, पृष्ठ 85- 91.

११] जा. क्र. कृमावि/ माअप्र/ खडतरे -2/118/17, कृषी माहिती विभाग, कृषी आयुक्तालय, पुणे.

१२] सत्कार समारंभ,1994 ,कृषी आयुक्तालय ,महाराष्ट्र राज्य, पुणे.